**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांकः 06.10.2023** **वारःशुक्रवार**

**ठळक बातम्या**

मध्य प्रदेशातील 12 हजार 600 कोटी रुपयांच्या विविध योजनांचं पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण आणि पायाभरणी

यंदाचं साहित्याचं नोबेल पारितोषिक नॉर्वेचे लेखक जॉन फॉसे यांना जाहीर

विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज पाकिस्तान आणि नेदरलँड यांच्यात सामना

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला 86 पदकं; आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी

मुंबईत काल रात्री लागलेल्या आगीत 6 जणांचा मृत्यू

आणि

सिक्कीममध्ये अतिवृष्टीमुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या 19 वर; मुख्यमंत्र्यांनी घेतला परिस्थितीचा आढावा

**मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल आपल्या मध्य प्रदेश दौऱ्यात जबलपूर इथं सुमारे १२ हजार सहाशे कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विकासकामांचं भूमिपूजन केलं आणि काही प्रकल्पांचं उद्घाटन केलं. यामध्ये रस्ते, रेल्वे, गॅस पाईपलाईन, आवास योजना आणि स्वच्छ पेयजल प्रकल्पांचा समावेश आहे.इंदोर इथं उभारण्यात आलेल्या एक हजार घरांच्या प्रकल्पांचं उद्घाटन यावेळी झालं. मांडला,जबलपूर आणि दिंडोरी जिल्ह्यातील जल जीवन मिशन अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पांच भूमिपूजन आणि सिवनी इथल्या काम पूर्ण झालेल्या जलजीवन मिशन प्रकल्पांचं लोकार्पण यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आलं. या प्रकल्पांमुळे शेतकरी आणि युवा वर्गासह सर्वच माणसांचं जीवन सुकर होईल आणि त्यामध्ये आमूलाग्र बदल घडून येईल,असं पंतप्रधान यावेळी म्हणाले. त्यापूर्वी त्यांच्या हस्ते जोधपूर इथं पाच हजारकोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या राष्ट्रीय बहुउद्देशीय विकास प्रकल्पांचं लोकार्पण करण्यात आलं. केंद्र सरकार रस्ते आणि रेल्वे यांचं जाळं अधिक विस्तृत करत सर्वच क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य देत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधानांनी जोधपूर इथं केलं.

**युएई गोयल**

वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल संयुक्त अरब अमिरातीच्या 2 दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. या भेटीच्या पहिल्या दिवशी काल त्यांनी अबू धाबी गुंतवणूक प्राधिकरणाचे व्यवस्थापकीय संचालक शेख हमेद बिन झायेद अल नाह्यान यांच्यासमवेत भारत - संयुक्त अरब अमिराती च्या गुंतवणूक विषयक

उच्चस्तरीय कृतीदलाच्या 11 व्या बैठकीचं अध्यक्षपद भूषवलं. दोन्ही देशांमध्ये व्यापार, गुंतवणूक आणि आर्थिक संबंध वृद्धिंगत करण्यासाठी 2013 मध्ये या कृतीदलाची स्थपना करण्यात आली आहे. या बैठकीत दोन्ही नेत्यांनी दोन्ही देशातल्या गुंतवणूकीचा आढावा घेतला.

**किरेन रिजीजू**

आगामी काळात अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ढगफुटी आणि भुकंपासारख्या नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना देणं शक्य होईल आणि त्यामुळे संभाव्य नुकसानही टाळता येईल असा विश्वास केंद्रीय पृथ्वी विज्ञान मंत्री कीरेन रीजीजू यांनी काल सातारा जिल्ह्यातल्या महाबळेश्वरमध्ये व्यक्त केला. त्यासाठी स्वदेशी बनावटीची डॉप्लर रडार यंत्रणा तयार केली जात असल्याचं ते म्हणाले. महाबळेश्वर इथल्या अति उंचावरील मेघ भौतिकशास्त्र प्रयोगशाळेला भेट देऊन पाहणी केल्यानंतर रीजीजू यांनी पत्रकारांशी संवाद साधला. हवामान क्षेत्रातील अत्याधुनिक संशोधनाचा आणि त्यातून दिल्या जाणाऱ्या अचूक अंदाजाचा फायदा देशभरातील शेतकरी आणि मच्छीमारांना होत असून, गेल्या 9 वर्षात या क्षेत्रात भारताने दमदार कामगिरी केल्याचं ते म्हणाले. महाबळेश्वर आंतरराष्ट्रीय पर्यटन केंद्र म्हणून नावारूपाला यावं अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**नोबल पुरस्कार**

यंदाचा साहित्यातला नोबल पुरस्कार नॉर्वेचे लेखक जॉन फॉसे याना जाहीर झाला आहे. फॉसे यांना हा पुरस्कार त्यांच्या नाविन्यपूर्ण नाटकांसाठी आणि गद्य साहित्यासाठी देण्यात आला आहे. फॉसे जगातल्या लोकप्रिय नाटककारांपैकी एक असून गद्य साहित्यात त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली असल्याचं स्वीडिश अकादमीनं म्हटलं आहे.मानवी स्वभावाचे पैलू आणि भावना हा त्यांच्या साहित्याचा विषय असल्याचं अकादमीनं नमूद केलं आहे.

**आर बी आय**

भारतीय रिझर्व्ह बँक आज आपलं  द्वैमासिक पतधोरण जाहीर करणार आहे. गेल्या पतधोरण आढाव्यात बँकेन रेपो दर साडेसहा टक्के कायम ठेवला होता.

**निवडणूक आयोग**

राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या फुटीसंदर्भात आज केंद्रीय निवडणूक आयोगासमोर सुनावणी होणार आहे. अजित पवार गटाने निवडणूक आयोगाकडे पक्षाचे निवडणूक चिन्ह मिळावे आणि अधिकृत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून मान्यता मिळावी, यासाठी अर्ज केला आहे. या दाव्याला शरद पवारांसोबत असलेल्या गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विरोध केला आहे.

**उपराष्ट्रपती**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज राजस्थानच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात ते लक्ष्मणगड इथल्या मोदी विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेमध्ये विद्यार्थीवर्गाशी संवाद साधणार आहेत.

**युक्रेन हल्ला**

युक्रेन मधल्या खार्किव प्रांताच्या आग्नेय भागातील ह्रोझा गावातल्या बाजारपेठेत, रशियन क्षेपणास्त्रानं केलेल्या हल्ल्यात किमान 51 लोक ठार  झाले आहेत. हल्ला झाला त्यावेळी स्थानिक लोक एका अंत्यसंस्कारासाठी एकत्र आले होते. नागरी भागांवर हल्ला करण्याचं यापूर्वीही रशियानं नाकारलं असून, आताही या हल्यासंदर्भात कुठलीही प्रतिक्रिया दिलेली नाही. या भागात कोणतंही लष्करी ठिकाण नसून केवळ नागरी वस्ती असल्याचं युक्रेनच्या संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**सिरीया ड्रोनहल्ला**

सिरीया मधल्या लष्करी अकादमीवर झालेल्या ड्रोन हल्ल्यात किमान 80 नागरिक ठार झाले तर 240 जण जखमी झाले असल्याची माहिती सिरीयाचे आरोग्यमंत्री हसन अल-घाबाश यांनी दिली.मृत्यूमुखी पडलेल्यांमध्ये 6 मुलांसह नागरिक आणि लष्करी जवानांचा समावेश आहे. लष्करी अकादमीतल्या पदवीप्रदान समारंभासाठी विद्यार्थ्यांच्या कुटुंबातील सदस्य, महिला आणि मुलं उपस्थित होते. सीरियाच्या लष्करानं  समर्थित दहशतवादी गटांना दोष दिला असला तरी या हल्ल्याची जबाबदारी मात्र अद्याप कोणत्याही गटानं स्वीकारलेली नाही.

**क्रिकेट**

विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातल्या सलामीच्या सामन्यात काल न्यूझीलंडनं इंग्लंडवर 9 गडी राखून मात केली. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी क्रिकेट मैदानावर झालेल्या यासामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडनं दिलेलं 283 धावांचं लक्ष्य न्यूझीलंडने 37 व्या षटकातच पूर्ण केलं. आज पाकिस्तान आणि नेदरलँड यांच्यात हैदराबादमध्ये सामना होणार आहे. भारताचा पहिला सामना येत्या रविवारी चेन्नईच्या एमए चिदंबरम मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातला सामना येत्या 14 ऑक्टोबरला अहमदाबाद इथं होणार आहे.

**क्रीडा**

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांमधे काल तिरंदाजीच्या सांघिक प्रकारात भारताच्या ओजस देवतळे, प्रथमेश जावकर आणि अभिषेक शर्मा यांच्या चमूनं कोरियाच्या संघाचा 235 विरुद्ध 230 असा पराभव करुन सुवर्णपदक मिळवलं. ज्योती सुरेखा वेण्णम, प्रणित कौर आणि अदिती गोपीचंद यांच्या महिला संघानेही तिरंदाजीत सुवर्णपदक मिळवलं. स्क्वॅशमधे मिश्रगटात दीपिका पल्लिकल आणि हरिंदर संधू यांच्या जोडीने मलेशियाच्या जोडीचा 2-0 असा पराभव करुन सुवर्णपदकाला गवसणी घातली. या

स्पर्धेमध्ये आतापर्यंत 21 सुवर्ण, 32 रौप्य आणि 33 कास्य पदकांसह 86 पदकं जिंकून भारत पदक तालिकेत चौथ्या स्थानावर आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत ही भारताची आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे.

**आग**

मुंबईतील गोरेगाव इथल्या एक सात मजली इमारतीला काल रात्री उशीर लागलेल्या भीषण आगीत सहा जण  ठार तर 30 पेक्षा अधिक लोक जखमी झाले आहेत. यापैकी सहा जणांची प्रकृती गंभीर आहे. मुंबई अग्निशामक दलाच पथक  घटनास्थळी पोहोचून काम करीत असून, आता आग आटोक्यात आली असल्याचं  समजतं .

**सिक्कीम पूर**

सिक्कीममध्ये आलेल्या भीषण पुरातल्या  मृतांची संख्या 19 वर पोहोचली आहे. 26 जण जखमी झाले असून, लष्करी जवानांसह 103 बेपत्ता असल्याची माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागानं दिली.दरम्यान, सिक्कीममध्ये उद्भवलेल्या पूरपरिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री पी. एस. तमांग यांनी काल स्वतंत्र बैठक घेतली. राज्याचे मुख्य सचिव व्ही. बी. पाठक यांच्यासह सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. पूरग्रस्त नागरिकांना बचाव, पुनर्वसन आणि इतर मदत पोहोचविण्याच्या दृष्टीनं आत्तापर्यंत राज्य सरकारनं भारतीय लष्कराच्या मदतीनं केलेल्या उपाय योजनांची माहिती मुख्य सचिवांनी मुख्यमंत्र्यांना दिली. यावेळी विविध विषयातील तज्ज्ञ, पर्यावरण अभ्यासक, जलविद्युत तज्ज्ञ, अभियंते, धरण अभ्यासक इत्यादी निष्णात व्यक्तींचा समावेश असलेली एक तांत्रिक समिती तातडीनं नियुक्त करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. या समितीनं सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेणं आणि त्याद्वारे भविष्यकाळात अशा समस्या रोखण्याच्या दृष्टीनं आराखडा तयार करणं अपेक्षित आहे. मांगन, गंगटोक, नामची, पॅकयोंग इथल्या शाळा, शासकीय आणि खाजगी महाविद्यालय येत्या 15 ऑक्टोबरपर्यंत बंद ठेवण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

**याबरोबरचं हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**